# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००४१५३**

**अपिलार्थी श्रीम. रिना रीचार्ड**
रई/४०६, एन. जी. सनसीटी पेज-२, ठाकुर विलेज,
कांदीवली (पु), मुंबई - ४०० १०१

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
भांडुप विभाग, भांडुप पोलीस ठाणे इमारत, पाचवा माळा
भांडुप (पश्चिम), मुंबई-४०० ०७८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (परि-७),**
**मुलुंड पोलीस ठाणे इमारत, पहिला मजला, नेताजी सुभाष रोड,**
**मुलुंड (पश्चिम), मुंबई – ८०.**

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.१०.२०२०</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | व्ही. सी. माध्यमाद्वारे उपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०२.२०१९ | १८.०२.२०१९ | ०७.०६.२०१९ | ०४.०७.२०१९ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.२३.०९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०३.०२.२०१९ चे दुपारी ०१.०० पासुन ते रात्री १०.०० वाजेपर्यंतचे भांडुप पोलिस स्टेशनच्या सी.सी.टी.व्ही. फुटेजची मागणी केली आहे. ही मागणी त्यांनी दि. ०४.०२.२०१९ रोजी माहितीचा अर्ज सादर करुन केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०२.२०१९ रोजी असे उत्तर दिलेले आहे की, माहिती उपलब्ध नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, भांडुप पोलिस स्टेशनमध्ये सी.सी.टी.व्ही. फुटेज २४ तासांपर्यंत ठेवण्यात येते.

विचारल्यावर अपिलार्थी यांनी असे सादर केले की, त्यांनी माहितीचा अर्ज दि. ०४.०२.२०१९ रोजी संध्याकाळी ५ वाजेअगोदर सादर केला होता. या कारणामुळे सी.सी.टी.व्ही. फुटेज सुरक्षित ठेवणे आवश्यक होते असे अपिलार्थी यांनी नमुद केले.

जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज किती वाजता प्राप्त झाला याची नोंद नाही.

प्रथम दर्शनीय केलेली कार्यवाही योग्य नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सी.सी.टी.व्ही. फुटेज सुरक्षित न ठेवण्याबाबत त्यांचा खुलासा आयोगासमोर सादर करावा.**

**२. प्रथम अपिलीय अधिकारी यांना तकनीकी विशेषज्ञ यांच्याकडून संबंधीत सी.सी.टी.व्ही. फुटेज परत मिळवणे शक्य असेल तर अपिलार्थीसंबंधीची फुटेज अपिलार्थी यांना निशुल्क उपलब्ध करुन दयावी व यासंबंधीचा अहवाल आयोगासमोर सादर करावा. सी.सी.टी.व्ही. फुटेज परत मिळवणे शक्य नसेल तर याबाबत विशेषज्ञचे प्रमाणपत्र सादर करावे.**

**३. या प्रकरणी पुढील सुनावणी दि. २३.११.२०२० रोजी घेण्यात येईल.**

State Information Commission, Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २१.१०.२०२०**

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००४१५३**
**अपिलार्थी श्रीम. रिना रीचार्ड**
**सुनावणी दिनांक : २३.११.२०२०(In continuation of dt २१.१०.२०२०)**

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.२३.०९.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले की, CCTV फुटेज परत मिळविण्यासाठी तकनिकी विशेषज्ञाकडे पाठविण्यात आलेले आहे. त्यांचे अहवाल आतापर्यंत प्राप्त झालेले नाही. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा सादर करण्यात आलेला आहे असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. तथापि, तो आज अभिलेखावर उपलब्ध नाही.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०४.०१.२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २३.११.२०२०**